# जिल्हाधिकारी कार्यालय, अमरावती

## रेती घाट ई-टेंडरींग व ई-लिलावाच्या संक्षिप्त अटी व शर्ती
## (ई-टेंडरींग-नि-ई-लिलाव)
## (तिसरी वेळ)

सन २०१५-१६ करिता दि. ३० सप्टेंबर २०१६ पर्यंत मुदतीसाठी वाळू / रेती निर्गती नवीन धोरण शासन (महसूल व वन विभाग) निर्णय क्र. गौखनि-१०/०५१२/प्र.क्र.३००/ख दिनांक १२ मार्च २०१३ तसेच शासन (महसूल व वन विभाग) निर्णय क्रमांक गौखनि-१०/ख/४९८.प्र.क्र./१०१४ दिनांक २३ डिसेंबर, २०१४ अन्वये रेती घाट ई-टेंडरींग-नि-ई-लिलाव पध्दतीचा अवलंब करण्यात येईल.

१. अमरावती जिल्हयातील सन २०१५-१६ या वर्षाच्या वाळू/रेती लिलाव पर्यावरण अनुमतीच्या अधिन राहून करण्यात येत आहे.

(अ) सदर लिलाव हे पर्यावरण अनुमतीच्या अधिन राहून करण्यात येत असून पर्यावरण अनुमती प्राप्त न होणा-या गटात उत्खननास परवानगी देण्यात येणार नाही.

(ब) पर्यावरण अनुमतीस उशीर झाला तरी सदरचे लिलाव हे दिनांक ३० सप्टेंबर, २०१६ पर्यंतच्याच कालावधी करीता राहतील.

(क) एखाद्या गटास पर्यावरण अनुमती प्राप्त झाली नाही, तर लिलावाधारकास फक्त त्याने भरलेली १/४ रक्कम परत करण्यात येईल. त्याकरिता लिलावधारकास कोणताही दावा/व्याजाची मागणी करता येणार नाही.

(ड) पर्यावरण अनुमती प्राप्त होताच लिलाव अंतिम केल्यानंतर लिलावाच्या बोली प्रमाणे उर्वरीत ३/४ रक्कम भरुन घेऊन लिलावधारकास वाळू/रेतीगटाचा ताबा देण्यात येईल.

लिलावाची कार्यवाही करताना ज्या वाळु गटांना पर्यावरण विभागाची मान्यता प्राप्त झाली त्या वाळु गटांच्या ई-टेंडरींग-ई-लिलावानंतर प्राप्त सर्वोच्च बोलीची रक्कम मंजुर करण्यांत येईल.

२. प्रचलित पध्दतीनुसार अमरावती जिल्हयातील रेती घाटाचे ई-टेंडरींग-ई-लिलाव करते वेळी सर्व प्रथम जिल्हा, तदनंतर तालुकावार आलेल्या संयुक्त रेती स्थळांच्या अपसेट किंमती पेक्षा जास्त किमत प्राप्त झाल्यास त्या किंमतीस प्रथम, व्दीतीय हया प्रमाणे प्राधान्य देण्यांत येईल. अशा प्रकारची बोली प्राप्त न झाल्यास वाळुघाट निहाय प्राप्त ई-टेंडर-ई-लिलावाला नियमानुसार मंजुरी प्रदान करण्यांत येईल.

३. ई-टेंडरिंग उघडल्यानंतर उच्चतम प्राप्त रक्कमे वरुन त्या रेतीघाटाचा ई-लिलाव घेण्यात येईल. त्या ई-लिलावात उच्चतम बोली बोलणा-याचे नावे त्या रेती घाटचा लिलाव मंजूर करण्यात येईल. **मात्र सदरच्या ई-लिलावास फक्त त्या त्या रेती गटाबाबत ई-टेंडर भरणा-यांनाच भाग घेता येईल, इतराना भाग घेता येणार नाही**. ई-लिलावात बोली न आल्यास ई-टेंडरच्या उच्चतम देकार स्वीकारण्यात येईल.

४. अमरावती जिल्हयातील रेतीघाट लिलाव सन २०१५-१६ करिता दि. ३०/०९/२०१६ पर्यंतच्या मुदतीसाठी ई-निविद-ई-लिलाव द्वारे निर्गती करणेसाठी ई-निविदा https://eauctioncollamr.abcprocure.com या वेबसाईटवर तसेच ई-लिलाव https://www.eauctioncollamr.abcprocure.com या वेबसाईटवर प्रसिध्द करण्यात आले आहेत. सदर वेबसाईटची लींक जिल्हाधिकारी कार्यालय, अमरावतीच्या amravati.nic.in या वेबसाईटवर देण्यात आलेली आहे. **ई-निविदा-ई-लिलाव प्रक्रीयेत भाग घेण्याकरीता कंत्राटदारांना डिजिटल-सिगनेचर असणे तसेच उपरोक्त वेबसाईटवर ऑनलाईन नोंदणी करणे आवश्यक आहे**. ई-निविदा नमुना फॉर्म, प्रतिज्ञापत्र, रेती स्थळांची/गटाची यादी, अटी व शर्ती, रु. ६५३९/- (ना-परतावा) टेंडर फी ई-पेमेंट जसे नेट-बैंकिंग/केडीट-कार्ड/डेबिटि-कार्ड (एनईएफटी/आरटीजीएस) पध्दतीने ICICI Bank, अमरावती यांचे कडे रु. ६५३९/- (मात्र वाळू गटाची हाताची किमत रु. १० लाख व त्यापेक्षा कमी असेल अशा वाळू गटा साठी अर्जाचे शुल्क रु. ३५३९/-) भरना करुन वरील वेबसाईट वरुन डाऊनलोड करुन खरेदी करता येईल. रेती स्थळ/गटा संबंधी ची विस्तृत माहिती उपरोक्त वेबसाईटवरही उपलब्ध करुन देण्यात आली आहे. लिलावाच्या ई-निविदा-ई-लिलावात भाग घेऊ इच्छिणा-या व्यक्तीला अनामत रक्कम म्हणुन रुपये ३,००,०००/- किंवा अपसेट प्राईजच्या २० टक्के रक्कम या पैकी जी जास्त असेल ती रक्कम ई-पेमेंट जसे नेट-बैंकिंग/ केडीट-कार्ड/ डेबिट-कार्ड (एनईएफटी/आरटीजीएस) पध्दतीने ICICI Bank, अमरावती यांचे मार्फत भरावा लागेल. ज्या ई-टेंडर/बोलीदाराची अत्युच्य बोली स्विकारण्यात येईल त्याची रक्कम नियमानुसार त्याने भरावयाच्या बोलीच्या १/४ इतक्या रकमेत समायोजीत करण्यात येईल. ज्या बोलीदारांची बोली स्विकारण्यात येणार नाही त्यांच्या अनामत रकम लिलाव संपल्यानंतर परत करण्यात येईल.

ब) ई-निविदा सोबत लिलावधारकास ठराविक नमुन्यातील डाऊन-लोड केलेला अर्ज भरुन तसेच रु. १००/- स्टॅम्प पेपरवर प्रतिज्ञापत्र, पॅन कार्ड (PAN CARD) आणि विक्रीकर विभागाचा रजिस्ट्रेशन क्रमांक (TIN CARD) विहित कालावधीत अपलोड करणे बंधनकारक आहे. पॅन कार्ड व टीन क्रमांक असलेल्या ई-निविदा-ई-लिलाव धारकांनाच लिलावात सहभागी होता येईल.